Estd:1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28th Rank

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्र.संकीर्ण– 22017/प्र.क्र.33–17/आस्था–2 दि. 26 मार्च, 2017 रोजीच्या पत्राने राज्यात शासनामार्फत विविध प्रकारच्या कल्याणकारी व लोकोपयोगी योजना राबविण्यात येतात. सदर योजना राबविताना योजनांचा शासनाकडून प्रचार, प्रसार व जाहिरात करण्यात येते. मात्र सदर योजनांची जाहिरात करताना क्षेत्रीय स्तरावरील अंमलबजावणी यंत्रणेतील काही अधिकारी त्यांचे फोटो वगैरे टाकून जाहिरात करीत असतात असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तेव्हा शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या योजनांचा प्रचार, प्रसार व जाहिरात करतांना कोणतेही अधिकारी स्वतःचा फोटो वगैरे टाकून जाहिरात करणार नाही. याची दक्षता घेण्यात यावी. तसेच एखाद्या अधिकाऱ्याने उपरोक्त सूचनेची दक्षता घेतली नाही तर अशा अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल असे कळविले आहे. तेव्हा सोबतचे शासन पत्र आपल्या विभागातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या निदर्शनास आणावे.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/1323
दिनांक : 20 MAY 2017

प्रति,

1. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
2. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी.
4. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
5. स्वीय सहाय्यक, मा.कुलगुरु, मा. प्रभारी प्र–कुलगुरु, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी
6. इंटरनेट विभाग– सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. (Intranet)

# महाराष्ट्र शासन

E-mail-rajendra.jadhav62@nic.in
दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६

क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३-१७/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४ था मजला, ४३१ ( विस्तार ),
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ०६.०३.२०१७

प्रति,

संचालक ( उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय ), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
उपसचिव ( महाविद्यालयीनशिक्षण /विद्यापीठशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय : शासनाच्या योजनांची जाहिरात करण्यासंदर्भात सूचना...

महोदय/महोदया,

राज्यात शासनामार्फत विविध प्रकारच्या कल्याणकारी व लोकोपयोगी योजना राबविण्यात येतात. सदरच्या योजना या विविध विभागांकडून राबविल्या जात असून त्याची अंमलबजावणी क्षेत्रीय स्तरावरील यंत्रणामार्फत केली जाते. सदर योजना राबविताना योजनांचा शासनाकडून प्रचार, प्रसार व जाहिरात करण्यात येते. मात्र सदर योजनांची जाहिरात करताना क्षेत्रीय स्तरावरील अंमलबजावणी यंत्रणेतील काही अधिकारी त्यांचे फोटो वगैरे टाकून जाहिरात करीत असतात असे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०१६ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात " अमरावती महानगरपालिका क्षेत्राकरीता प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांची यादी निश्चित करण्याच्या प्रक्रियेत स्थानिक विधानसभा सदस्यांना सहभागी न करणे " या विषयाच्या अनुषंगाने मांडलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेवरील चर्चेदरम्यान मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांनी " कोणताही अधिकारी अशा पद्धतीने सरकार च्या योजनेच्या संदर्भात स्वतः चा फोटो काढून जाहिरात करीत असेल तर राज्यभरामध्ये यासंदर्भात योग्य पद्धतीने सूचना देऊन अशा लोकांना दंड करण्याचा निर्णय शासन घेईल " असे आश्वासन दिले आहे.

राज्यात शासनामार्फत राबविण्यात येणा-या विविध प्रकारच्या योजनांचा प्रचार, प्रसार व जाहिरात करतांना कोणतेही अधिकारी स्वत:चा फोटो वगैरे टाकून जाहिरात करणार नाही याची दक्षता घेण्यात यावी तसेच या उपरही क्षेत्रीय स्तरावरील यंत्रणेतील एखाद्या अधिका-याने उपरोक्त सूचनेची दक्षता घेतली नाही तर अशा अधिका-यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

तरी आपल्या उपविभागाच्या अधिनस्त कार्यालयांना याबाबत दक्षता घेण्याबाबत सूचना द्याव्यात, ही विनंती.

आपला,

( रा.वि.जाधव )
कक्ष अधिकारी , महाराष्ट्र शासन

C:\Users\shirish.padolwa\Documents\IF.CP_33_2018.docx